# अर्जदारांसाठी सुचना

ऑनलाईन अर्ज भरताना खालील सुचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

## A) सर्वसाधारण सुचना

1. उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी सविस्तर जाहिरात व इतर सुचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
2. अर्ज खालील पोर्टलद्वारे ऑनलाईन भरता येईल:


   **https://sgbaurec.samarth.edu.in**

3. उमेदवारांनी वैध ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक द्यावा. भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कालावधीत तो सक्रिय असणे आवश्यक आहे. शक्यतो स्वतःचा ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक वापरावा.
4. Recruitment पोर्टलसाठी तयार झालेले Login credentials जतन करून ठेवावेत.
5. ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी खालील माहिती व स्कॅन केलेली कागदपत्रे तयार ठेवावीत:
   - वैयक्तिक माहिती
   - शैक्षणिक पात्रता
   - अध्यापन / संशोधन / व्यावसायिक अनुभव (लागू असल्यास)
   - संशोधन प्रकाशनांची माहिती
   - प्रवर्ग व आरक्षण प्रमाणपत्रे (लागू असल्यास)
   - आवश्यक स्वरूप व size मधील छायाचित्र व स्वाक्षरी (scanned copy)
   - शैक्षणिक, अध्यापन व संशोधन विभागासाठी आवश्यक कागदपत्रे
   - इतर संबंधित पूरक कागदपत्रे
6. ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर डाउनलोड केलेल्या अर्जाची हार्ड कॉपी आवश्यक संख्येतील ATR फॉर्मसह विद्यापीठ कार्यालयात अंतिम तारखेपूर्वी सादर करावी.
7. सादर केलेल्या अर्जाची एक प्रत उमेदवारांनी स्वतःकडे जतन करून ठेवावी.
8. ATR फॉर्मच्या प्रत्येक संचासोबत शैक्षणिक, अध्यापन व संशोधनाशी संबंधित कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती जोडाव्यात.
9. डाउनलोड केलेल्या अर्जाच्या प्रत्येक संचासोबत इतर आवश्यक कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती जोडाव्यात.
10. शेवटच्या क्षणी तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी अर्ज प्रक्रिया अंतिम तारखेपूर्वी पूर्ण करावी.
11. ऑनलाईन प्रक्रियेदरम्यान उद्भवणाऱ्या तांत्रिक किंवा payment gateway संदर्भातील अडचणींसाठी विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.
12. भरती प्रक्रियेबाबत अद्ययावत माहिती व पुढील सूचनांसाठी उमेदवारांनी नियमितपणे विद्यापीठाची वेबसाइट व Recruitment portal पाहावे.

## B) पुर्वी अर्ज केलेल्या उमेदवारांसाठी सुचना

ज्यांनी पुर्वी जाहिरात क्रमांक SGBAU/1/103/2-606/2024 दिनांक 09/10/2024 अंतर्गत भरती पोर्टलवरून अध्यापक पदांसाठी अर्ज केला होता आणि ज्यांचे अर्ज पोर्टलद्वारे सादर झाले होते, त्यांनी नवीन अर्ज पुन्हा भरावा. अशा उमेदवारांना Application Fees पुन्हा भरण्याची आवश्यकता नाही.

1. अशा उमेदवारांनी नवीन registration करू नये.
2. पुर्वी अर्ज करताना तयार केलेल्या User ID व Password चा वापर करून login करावे.
3. खाते उघडता न आल्यास पोर्टलच्या login पेजवर उपलब्ध “Reset Password” सुविधा वापरावी.
4. पुर्वी अर्ज करून शुल्क भरले असल्यास नवीन अर्ज सादर करताना पुन्हा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.
5. Application fee मधून सूट मिळवण्यासाठी खालील प्रक्रिया करा:
    a) “Declaration” विभागात जा.
    b) “Have you applied in this department for the same position against advertisement No. SGBAU/1/103/2-606/2024 (XXX/2024)………..” हा पर्याय निवडा.
    c) ड्रॉपडाऊन यादीमधून “Yes” निवडा.
    d) पुर्वी सादर केलेला Application Form Number प्रविष्ट करा. (उदा. CSBTXXX)
    e) यामुळे अर्ज शुल्क भरण्यापासून सूट मिळेल.


Have you applied in this department for the same position against advertisement No. SGBAU/1/103/2-606/2024(AP[redacted]/2024) or its addendum/corrigendum? *

Yes *

No *

Please Enter Form No

CSBT[redacted]

6. पुर्वीचा अर्ज dashboard वरून डाउनलोड करता येईल.

## C) ऑनलाईन अर्ज भरताना मार्गदर्शक सुचना

SAMARTH portal वर अर्ज करण्यापूर्वी खालील सुचना काळजीपूर्वक वाचा.

**1) स्कॅन केलेल्या कागदपत्रांसाठी तपशील:**

| क्रमांक | कागदपत्राचे नाव | Acceptable Format | Acceptable Size |
|---|---|---|---|
| 1. | फोटो व स्वाक्षरी | jpg/jpeg/png | 20 KB to 100 KB |
| 2. | X/XII प्रमाणपत्र (जन्मतारीख दर्शविणारे) | pdf/jpg/jpeg/png | 20 KB to 100 KB |
| 3. | प्रवर्ग प्रमाणपत्र | pdf/jpg/jpeg/png | 20 KB to 500 KB |
| 4. | अतिरिक्त अपलोड (Small Family Declaration, इ.) | pdf/jpg/jpeg/png | 100 KB to 500 KB |
| 5. | शैक्षणिक पात्रता | pdf/jpg/jpeg/png | Max. 500 KB |
| 6. | प्रशासकीय अनुभव | pdf/jpg/jpeg/png | Max. 500 KB |
| 7. | संशोधन प्रकाशने / पेटंट | pdf/jpg/jpeg/png | Max. 500 KB |
| 8. | सन्मान व पुरस्कार | pdf/jpg/jpeg/png | Max. 500 KB |

**2)** खालील माहिती Assistant Professor पदासाठी अनिवार्य नाही. माहिती द्यायची नसल्यास “NIL” लिहावे.

**2.1 Academic Qualification**

- kindly indicate in 100 words as to what makes you suitable for being considered under this Section

**Ph.D.**

- Salient features of your Ph.D. research work (Max. 100 words)

Additional Information:

**5.1**

- How would you create an innovative learning environment? (max 100 words)
- Outline your most significant contribution towards research. (in 100 words)
- Outline your proposed roadmap for teaching and research for the next five years (in 100 words) Membership/Fellowship of Academies/Institutions/Professional Societies.
- Present your vision for the University / Department for next five years Other activities/responsibilities: (academic/administrative).
- Any other relevant information, if not given above.

## 3) पोर्टलसंबंधी इतर सुचना:

1. **‘Education’ tab:**

   Under ‘Ph.D.’,

   **Date of submission:**

   Ph.D. thesis सादर करण्याची अचूक तारीख उपलब्ध नसल्यास Ph.D. Notification ची तारीख नमूद करू शकता.

2. **Upload for NET/SET Exemption:**

   - Sep 2009 पुर्वी Ph.D. प्राप्त असल्यास ‘NET Exemption Certificate’ ऐवजी ‘Ph.D. Notification’ अपलोड करावे.

   - आपला विषय NET/SET/SLET पासून सूट असलेला असल्यास ‘Self-declaration’ अपलोड करावे.

3. **“Upload” tab**

   i) X/XII प्रमाणपत्र (DOB दर्शविणारे) उपलब्ध नसल्यास खालील कागदपत्रांपैकी कोणतेही अपलोड करू शकता: (Birth Certificate, Domicile Certificate, T.C.)

   ii) Category Certificate :-

   - SC/ST वगळता इतर राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी caste certificate व Non-Creamy Layer certificate अपलोड करणे आवश्यक आहे.
   - SEBC प्रवर्गातील उमेदवारांनी SEBC certificate अपलोड करावे.
   - EWS प्रवर्गातील उमेदवारांनी EWS certificate अपलोड करावे.

4. **Full time teaching (experience)**

   Pay slip उपलब्ध नसल्यास संबंधित कागदपत्र किंवा self-declaration अपलोड करू शकता.